महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
| --- | --- | --- |
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


क्रमांक /पुविमं/शाखा डी.पी./ 242
पुणे. ४११००५
दि. 14-01-2025

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
जिल्हा
पुणे व अहिल्यानगर.

**विषय :- सन २०२५ मधील इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा केंद्रावर अखंडीत विद्युत पुरवठा ठेवणेबाबत...**
**संदर्भ :-**

**१) जा.क्र.क्र.रा.मं/परीक्षा-४/४६६९ दि. ०३.१२.२०२४**
**२) क्र.पुविमं/डीपी/६४६३ दि. १०/१२/२०२४**
**३) जा.क्र.शिक्षण/माध्य/कार्या-२/३९५/२०२५ दि. ०८.०१.२०२५**
**४) जा.क्र.विअ/बोर्ड परीक्षा/०६/२०२५/६७ दि. ०८.०१.२०२५**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, राज्य मंडळाचे संदर्भिय पत्र क्र. १ नुसार मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे दि. २७.०२.२०१५ रोजीच्या अंतरिम आदेशास अनुसरुन फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा केंद्रावर विद्युत पुरवठा खंडीत होवू नये यासाठी जनरेटर/इनव्हर्टर/सौरऊर्जा इ. सुविधा असणे अत्यंत आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने संदर्भिय क्रमांक २ अन्वये शिक्षणाधिकारी माध्यमिक पुणे, अहिल्यानगर व सोलापूर यांना सर्व परीक्षा केंद्रावर जनरेटर/इनव्हर्टर/सौरऊर्जा इ. सुविधा असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच याबाबत प्रपत्र १ व प्रपत्र २ मधील माहिती सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार शिक्षणाधिकारी माध्यमिक जि.प. पुणे यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये माहिती सादर केलेली आहे. परंतु सदर माहितीनुसार इ. १० वी व इ. १२ वी दोन्ही मिळूण १२७ परीक्षा केंद्राची माहिती अप्राप्त आहे व ७९ परीक्षा केंद्रावर जनरेटर/इनव्हर्टर/सौरऊर्जा यापैकी एकही सुविधा उपलब्ध नाही. तसेच शिक्षणाधिकारी जि.प. अहिल्यानगर यांनी संदर्भ क्र. ४ अन्वये माहिती सादर केलेली आहे. सदर माहितीनुसार इ. १० वी व इ. १२ वी दोन्ही मिळूण १५ परीक्षा केंद्रावर जनरेटर/इनव्हर्टर/सौरऊर्जा यापैकी एकही सुविधा उपलब्ध नाही.

सदरची बाब अत्यंत गंभीर असून सदर ज्या परीक्षा केंद्रावर जनरेटर/इनव्हर्टर/सौरऊर्जा यापैकी एकही सुविधा उपलब्ध नाही. अशा केंद्रावर दि. १६.०१.२०२५ पर्यंत सुविधा उपलब्ध करुन घेण्यात यावी व त्याची माहिती या कार्यालयास सादर करावी. याबाबत मुदतीत कार्यवाही न केल्यास परीक्षा केंद्रावर नियमानुसार कारवाई केली जाईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे. ४११००५